## अर्ज निशाणी क्रमांक ४५ वर आदेश
(पारीत केल्याची तारीख **०७.०३.२०१८**)

(सी.एन्.आर.क्रमांक एम्.एच्.आर.जी. ०९०००८२८-२०१७)

**०१.** प्रस्तुत संयुक्त अर्ज प्रतिवादी क्रमांक ०२, ०३, ०५, ०६ व १२ यांनी त्यांच्याविरुद्ध वादपत्रावर झालेला ''विना म्हणणे व विना कैफियत'' आदेश रद्द करण्यासाठी **दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चा क्रम ०८ नियम १०** नुसार दाखल केला आहे.

**०२.** वादीतर्फे विधीज्ञांनी म्हणणे दाखल करुन अर्ज मुदतबाह्य आहे म्हणून अर्जास हरकत घेतली.

**०३.** प्रतिवादींतर्फे विधीज्ञ सौ. एम्. एन्. मनोहर गैरहजर. वादीतर्फे विधीज्ञ श्री. आर. बी. सावंत यांचा युक्तीवाद ऐकला.

**०४.** प्रतिवादी क्रमांक ०२, ०३, ०५ व ०६ यांना दावा समन्स **नि.क्र.१०** आणि प्रतिवादी क्रमांक १२ ला दावा समन्स **नि.क्र.१४** ची बेलिफाच्या अहवालानुसार दिनांक **११.१०.२०१७** रोजी बजावणी झाली आहे. प्रतिवादी क्रमांक १२ दिनांक **१६.१०.२०१७** रोजी हजर होवूनही त्याने मुदतीत कैफियत व म्हणणे दाखल केले नाही. म्हणून त्याच्याविरुद्ध वादपत्र **नि.क्र.०१** वर दिनांक **०४.११.२०१७** रोजी दावा ''विना कैफियत'' व अर्ज **नि.क्र.०५** ''विना म्हणणे'' चालवण्याचा आदेश पारीत झाला आहे. प्रतिवादी क्रमांक ०२, ०३, ०५ व ०६ समन्स बजावणी होवूनही हजर न झाल्याने त्यांच्याविरुद्ध दिनांक **०४.११.२०१७** रोजी दावा ''**एकतर्फा**'' चालवण्याचा आदेश पारीत झाला आहे.

**०५.** दावा स्थावर मिळकतीबाबत आहे. प्रतिवादींना म्हणणे व कैफियत दाखल करण्याची संधी नाकारल्यास त्यांचे नुकसान होईल. प्रतिवादींना दाव्यामध्ये म्हणणे व कैफियत दाखल करुन त्यांना बचाव मांडण्याची संधी दिल्यास वादाचे कायमपणे निराकरण होण्यास मदत होईल. वादीचे त्यामुळे कोणतेही नुकसान संभवत नाही. म्हणून प्रतिवादींविरुद्ध **दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चा क्रम ०८ नियम १०** नुसार प्रतिवादी क्रमांक १२ विरुद्ध दावा **''विना म्हणणे व विना कैफियत''** व प्रतिवादी क्रमांक ०२, ०३, ०५ व ०६ त्यांच्याविरुद्ध **''एकतर्फा''** चालवण्याचा झालेला आदेश रद्द करणे उचित होईल. म्हणून खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

## आ दे श

**०१.** प्रतिवादींचा अर्ज **नि.क्र.४५** मंजूर करण्यात येतो.

**०२.** वादपत्र **नि.क्र.०१** वर प्रतिवादी क्रमांक १२ विरुद्ध दावा ''विना कैफियत'' व अर्ज **नि.क्र.०५** ''विना म्हणणे'' व प्रतिवादी क्रमांक ०२, ०३, ०५ व ०६ त्यांच्याविरुद्ध ''एकतर्फा'' चालवण्याचा झालेला आदेश **दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चा क्रम ०८ नियम १०** नुसार रद्द करुन त्यांचे म्हणणे व कैफियत अभिलेखावर सामील करुन घेण्यात येते.

**०३.** अर्जाचा खर्च दाव्यात समावीष्ट करण्यात येतो.

**---स्वाक्षरी---**
**(सुभाष ल. फुले)**
**(एम एच आर जी ०००९ - २१२५)**
**दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, रोहा.**
**जिल्हा रायगड**

**स्थळ : रोहा**
**दिनांक : ०७.०३.२०१८**